**<u>सीएनआर नं. एमएचएसआय–०७–०००४९९–२०१६</u>**

**<u>नि.दि.मु.क्र. ७९/२०१६ मधील नि.क्र. ३२ वरील आदेश</u>**

प्रस्तुतचा दावा आज्ञार्थी मनाई हुकूम होवून मिळणेसाठी दाखल करण्यात आलेला आहे.

०२. प्रस्तुतचा अर्ज वादीने वादपत्रात दुरुस्ती आणण्यासाठी दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ चे क्रम ६ नियम १७ आणि क्रम १ नियम १० अन्वये दाखल केलेला आहे. अर्जातील वादीचे थोडक्यात असे कथन आहे की, प्रस्तुतकामी प्रतिवादी क्र. १ व २ यांनी कैफियत दाखल करुन गटविकास अधिकारी पंचायत समिती मालवण यांना याकामी आवश्यक पक्षकार म्हणून सामील करण्यात आलेले नाही अशी तक्रार उपस्थित केलेली आहे त्यामुळे गटविकास अधिकारी पंचायत समिती मालवण यांच्यासह अर्जातील नमूद इसमांना प्रतिवादी क्र. ३ ते ६ म्हणून सामील करुन घेण्याची व तशी दुरुस्ती करण्याची वादीस परवानगी मिळणे आवश्यक आहे. तसेच वादपत्रातील परिच्छेद क्र. २ च्या शेवटी 'सदर दाव्याचे कामी .........वादीस कोणतीही दाद मागावयाची नाही' असा मजकूर समाविष्ट करण्याची वादीस परवानगी मिळावी. प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याच्या मुळ स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. अर्ज नामंजूर झाल्यास वादीचे पैशात भरुन न येणारे अपरिमित असे नुकसान होणार आहे. सबब अर्ज मंजूर करण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती वादीने केली आहे.

०३. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी प्रस्तुत अर्जाकरीता आपले म्हणणे दाखल करुन अर्जास आक्षेप नोंदविला आहे. त्यांचे थोडक्यात असे म्हणणे आहे की, दि. १९/०९/२०१७ रोजी प्रतिवादींनी आपली कैफियत दाखल केलेली असून न्यायालयाने ती कैफियत दि. ०४/१२/२०१७ रोजी स्वीकारलेली आहे. दि. १९/०१/२०१८ रोजी प्रस्तुतकामी मुद्दे निश्चित करण्यात आलेले आहेत. त्यानंतर वादीने सुमारे १ वर्षाच्या कालावधीनंतर प्रस्तुतचा अर्ज दाखल केला असल्याने खर्चासह तो फेटाळण्यात यावा. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती सदर प्रतिवादींनी केली आहे.

०४. अर्ज व म्हणण्यातील कथनांवरुन खालील मुद्दे माझ्या विचाराधीन

उपस्थित होतात. ते मुद्दे व त्यावरील माझे निष्कर्ष सबळ कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविण्यात येत आहेत.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १ | प्रस्तावित दुरुस्ती दाव्याचे खरेखुरे वादप्रश्न अंतिमत: निकाली काढण्याकरीता आवश्यक आहे काय? | होय. |
| २ | प्रस्तावित दुरुस्तीमुळे दाव्याचे मुळ स्वरुप बदलणार आहे काय? | नाही. |
| ३ | प्रस्तावित दुरुस्तीमुळे विरुध्द पक्षकारांचे काही नुकसान होणार आहे काय? | नाही. |
| ४ | अंतिम आदेश कोणता? | अर्ज मंजूर करण्यात येतो. |

## कारणमिमांसा

**मुद्दे क्र. १ ते ३ करीता :—**

०५. सदरील मुद्दे न्यायाच्या दृष्टिकोनातून एकत्रीतपणे विवेचनासाठी घेण्यात आले आहेत. उभयपक्षकारांतर्फे संपुर्ण युक्तिवाद ऐकला.

०६. दिवाणी प्रक्रिया संहितेचे क्रम ६ नियम १७ या तरतुदीअन्वये असे प्रमाणित करण्यात आले आहे की, न्यायालयास कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर दोन्हीपैकी कोणत्याही पक्षकारास, त्यांच्या वादकथनास, न्याय्य असेल अशारितीने व अशा अटींवर फेरबदल करण्याची किंवा सुधारणा करण्याची मुभा देण्यात येईल आणि पक्षकारांमध्ये वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णीत करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा केल्या पाहिजेत. परंतु न्यायचौकशी सुरु झाल्यानंतर, पक्षकाराने योग्य ती खबरदारी घेऊनसुध्दा न्यायचौकशी सुरु होण्यापुर्वी ती बाब पुढे आणता आली नाही याबाबत न्यायालयाचे समाधान झालेले असल्याखेरीज सुधारणेसाठीचा अर्ज अनुज्ञेय असणार नाही.

 **नि.दि.मु.क्र. ७९/२०१६ मधील**

**नि.क्र. ३२ वरील आदेश**

०७. दिवाणी प्रक्रिया संहितेचे क्रम ६ नियम १७ या तरतूदीनुसार, जर प्रस्तावित सुधारणेमुळे विरुध्द बाजूस अन्याय होणार नसेल व दाव्यातील खरे प्रश्न अंतिमत: निकाली काढण्याकरीता प्रस्तावित सुधारणा अभिलेखावर असणे आवश्यक असेल तर अशा दुरुस्तीस परवानगी देणे गरजेचे असते. केवळ उशिर झाला म्हणून दावा दुरुस्तीचा अर्ज न्यायालयास फेटाळता येणार नाही. तसेच नवे वादकारण समाविष्ट करणेकरीता सदर तरतूदीनुसार वादीस प्रस्तावित दुरुस्ती करण्याची मंजूरी देता येणार नाही.

०८. अभिलेख व रोजनामा यांचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दि. १९/०१/२०१८ रोजी नि.क्र. २७ वर मुद्दे निश्चित झालेले असून त्यापुर्वीच वादीतर्फे साक्षीदाराचे पुराव्याचे शपथपत्र दाखल करण्यात आलेले होते. प्रतिवादींची कैफियत नंतर अभिलेखावर घेण्यात आली असल्याने वादीतर्फे साक्षीदाराच्या उलटतपासाकरीता प्रकरण नोंदविण्यात आलेले आहे ही अभिलेखावरील बाब आहे.

०९. प्रस्तावित दुरुस्तीतील मजकूर पाहता; वादी हा वादपत्रात औपचारिक स्वरुपाची प्रस्तुत अर्जाद्वारे दुरुस्ती आणू इच्छित असून अर्जातील नमूद इसमांना प्रतिवादी क्र. ३ ते ६ म्हणून वादपत्रात तो सामील करु पाहत असल्याचे दिसून येते. प्रकरणाची आजची स्थिती पाहता प्रस्तावित दुरुस्तीचा अर्ज मंजूर करण्याने दाव्याचे मुळ स्वरुप बदलणार आहे असे कोठेही दिसून येत नाही. तसेच अर्ज मंजूर करण्याने कोणत्याही प्रतिवादीचे नुकसान होणार आहे अशी शक्यता दिसून येत नाही कारण त्यांना अतिरिक्त कैफियत दाखल करण्याची कायदेशीर मुभा आहे. तथापि; अर्ज दाखल करण्यास वादीने केलेला विलंब पाहता त्याच्यावर रक्कम रुपये ५००/— इतका खर्च आकारुन आणि खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १ व २ यांना देवू करुन अर्ज मंजूर करणे न्यायोचित होईल. करीता वरील संपूर्ण विवेचनावरुन मुद्दा क्र. १ याचा निष्कर्ष 'होकारार्थी' नोंदविण्यात येवून, मुद्दे क्र. २ व ३ यांचे निष्कर्ष 'नकारार्थी' नोंदविण्यात येत आहेत. करीता मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल खालीलप्रमाणे आदेश निर्गमित करण्यात येतो.

**आदेश**

१. अर्ज वादी याच्यावर रक्कम रु. ५००/— (रक्कम रुपये पाचशे) फक्त इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तावित दुरुस्ती प्रस्तुतचा आदेश झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत वादपत्रात करुन घ्यावी.

३. खर्चाची रक्कम प्रतिवादी क्र. १ व २ यांना प्रस्तुतचा आदेश झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या कालावधीत अदा करण्यात यावी. तसे न झाल्यास प्रस्तुतचा आदेश रद्दबातल करण्यात येईल.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/—

दिनांक :२१ फेब्रुवारी, २०१९ (आर.आर.काळे)
ठिकाण :—मालवण. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.